MHAU070026182025

<u>दिवाणी अर्ज क्र.२७४/२०२५</u>

**( कल्याण नामदेव भुजंग व इतर–विरुध्द– मंदा विनायक गाडेकर )**

**निशाणी क्र. १० खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२ प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराचे असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरण हे पुराव्याकरीता प्रलंबित असताना सामनेवाला क्र. ३ नामे कल्याण नामदेव भुजंग यांचे दि. ०८.०४.२०२५ रोजी मयत झाले आहेत. काही कारणांमुळे त्यांचे वारस पटलावर घेण्याचे राहुन गेले. प्रकरण कायमस्वरुपी निकाली काढण्याकरीता अबेटमेंट सेट असाईड करुन वारस पटलावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे झालेला विलंब माफ करणेसाठी सदर आदेश बाजुस सारुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. गैरअर्जदार याने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदाराचे असे कथन आहे की,सदर अर्ज हा कायदेशिर नाही. विलंबाचे कारण देखील नमुद नाही. सबब अर्ज नामंजुर करण्याची विनंती सामनेवाल्याने केली आहे.

४. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणाच्या अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणातील गैरअर्जदार क्र. ३ नामे कल्याण नामदेव भुजंग हे दि. ०८.०४.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. भारतीय मुदत अधिनियम १९६३ मधील अनुच्छेद १२० मध्ये नमुद केल्याप्रमाणे, मृत व्यक्तीच्या अथवा मृत गैरअर्जदाराच्या वैध प्रतिनिधीला पक्षकार म्हणुन सामील करुन घेण्याकरीता, संबंधीच्या मृत्युनंतर ९० दिवसाच्या कालावधी निश्चित केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सामनेवाला क्र. ३ हे दि.०८.०४.२०२५ रोजी मयत झाले असुन सदर अर्ज दि.०१.११.२०२५ रोजी दाखल

केलेला आहे. याचाच अर्थ सदर अर्ज दाखल करण्यास, कल्याण नामदेव भुजंग मयत झाल्यापासुन सात महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. तसेच विलंबाचे नमुद केलेले कारण योग्य नाही. मात्र वारसांना पटलावर न घेतल्यास अर्जाच्या निकाल वारसदारांच्या बाजुने आल्यास, वारसदारांना फायदा होणार नाही. सबब मयताचे वारस पटलावर घेणे आवश्यक आहे. उपरोक्त कारण मिमांसेवरुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

आदेश

१. अर्ज रक्कम रुपये ३०० कॉस्टवर मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. ३ चे वारस पटलावर घेण्यास झालेला विलंब क्षमापीत करण्यात येतो.

३. सदर कॉस्ट अर्जदाराने सामनेवाला यांना दयावी.

४. दोन्ही विधीज्ञांनी आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2025.11.12 12:00:20 -0100

दि. ११/११/२०२५

**(आर.एन. पाठक )**
सह दिवाणी न्यायाधीश, (व.स्तर),
गंगापुर

MHAU070026182025

**<u>दिवाणी अर्ज क्र.२७४/२०२५</u>**
**( कल्याण नामदेव भुजंग व इतर–विरुध्द– मंदा विनायक गाडेकर )**
**निशाणी क्र.९ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र. ३ विरुध्द प्रकरण अबेट झाल्याचा आदेश बाजुस सारुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२ प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराचे असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरण हे पुराव्याकरीता प्रलंबित असताना सामनेवाला क्र. ३ नामे कल्याण नामदेव भुजंग यांचे दि. ०८.०४.२०२५ रोजी मयत झाले आहेत. काही कारणांमुळे त्यांचे वारस पटलावर घेण्याचे राहुन गेले. प्रकरण कायमस्वरुपी निकाली काढण्याकरीता अबेटमेंट सेट असाईड करुन वारस पटलावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. ३ विरुध्द प्रकरण अबेट झाल्याचा आदेश बाजुस सारुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. गैरअर्जदार याने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदाराचे असे कथन आहे की,सदर अर्ज हा कायदेशिर नाही. अर्जदार व गैरअर्जदार हे नात्याने भाऊ आहेत. गैरअर्जदार अशोक हा मयत झाल्याबाबत अर्जदारास पुर्वी पासुन माहिती होते. त्यामध्ये कोणतेही सबळ कारण नमुद नाही. प्रकरण गुंतागुंत निर्माण करण्याचे उददेशाने अर्ज सादर केला आहे.सदरचा अर्ज मुदत संपल्यानंतर दिला असल्याने खर्चासह रुपये ५०००/- नामंजुर सबब अर्ज नामंजुर करण्याची विनंती सामनेवाल्याने केली आहे.

४. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणाच्या अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणातील गैरअर्जदार क्र. ३ नामे कल्याण नामदेव भुजंग हे दि. ०८.०४.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. भारतीय मुदत अधिनियम १९६३ मधील अनुच्छेद १२० मध्ये नमुद केल्याप्रमाणे, मृत व्यक्तीच्या अथवा मृत गैरअर्जदाराच्या वैध प्रतिनिधीला पक्षकार म्हणुन सामील

करुन घेण्याकरीता, संबंधीच्या मृत्युनंतर ९० दिवसाच्या कालावधी निश्चित केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सामनेवाला क्र. ३ हे दि.०८.०४.२०२५ रोजी मयत झाले असुन सदर अर्ज दि.०१.११.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. याचाच अर्थ सदर अर्ज दाखल करण्यास, कल्याण नामदेव भुजंग मयत झाल्यापासुन सात महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. तसेच विलंबाचे नमुद केलेले कारण योग्य नाही. मात्र वारसांना पटलावर न घेतल्यास अर्जाच्या निकाल वारसदारांच्या बाजुने आल्यास, वारसदारांना फायदा होणार नाही. सबब गैरअर्जदार क्र. ३ विरुध्द प्रकरण अबेट झाल्याचा आदेश बाजुस सारणे न्यायोचित होईल. उपरोक्त कारण मिमांसेवरुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. ३ विरुध्द प्रकरण अबेट झाल्याचा आदेश बाजुस सारण्यात येतो.

३. दोन्ही विधीज्ञांनी आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2025.11.12 12:00:26 -0100

दि. ११/११/२०२५

**(आर.एन. पाठक )**
सह दिवाणी न्यायाधीश, (व.स्तर),
गंगापुर

MHAU070026182025

**दिवाणी अर्ज क्र.२७४/२०२५**
**( कल्याण नामदेव भुजंग व इतर–विरुध्द– मंदा विनायक गाडेकर )**
**निशाणी क्र. ७ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र. ३ यांचे वारस पटलावर घेण्याकरीता दाखल केलेला आहे.

२ प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराचे असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरण हे पुराव्याकरीता प्रलंबित असताना सामनेवाला क्र. ३ नामे कल्याण नामदेव भुजंग यांचे दि. ०८.०४.२०२५ रोजी निधन झाले आहेत. काही कारणांमुळे त्यांचे वारस पटलावर घेण्याचे राहुन गेले. प्रकरण कायमस्वरुपी निकाली काढण्याकरीता अबेटमेंट सेट असाईड करुन वारस पटलावर घेणे गरजेचे आहे. त्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. गैरअर्जदार याने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदाराचे असे कथन आहे की,सदर अर्ज हा कायदेशिर नाही. अर्जदार व गैरअर्जदार हे नात्याने भाऊ आहेत. गैरअर्जदार अशोक हा मयत झाल्याबाबत अर्जदारास पुर्वी पासुन माहिती होते. त्यामध्ये कोणतेही सबळ कारण नमुद नाही. प्रकरण गुंतागुंत निर्माण करण्याचे उददेशाने अर्ज सादर केला आहे.सदरचा अर्ज मुदत संपल्यानंतर दिला असल्याने खर्चासह रुपये ५०००/- नामंजुर करण्याची विनंती सामनेवाल्याने केली आहे.

४. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणाच्या अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणातील गैरअर्जदार क्र. ३ नामे कल्याण नामदेव भुजंग हे दि. ०८.०४.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. भारतीय मुदत अधिनियम १९६३ मधील अनुच्छेद १२० मध्ये नमुद केल्याप्रमाणे, मृत व्यक्तीच्या अथवा मृत गैरअर्जदाराच्या वैध प्रतिनिधीला पक्षकार म्हणुन सामील करुन घेण्याकरीता, संबंधीच्या मृत्युनंतर ९० दिवसाच्या कालावधी निश्चित केलेला आहे. प्रस्तुत

प्रकरणाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सामनेवाला क्र. ३ हे दि.०८.०४.२०२५ रोजी मयत झाले असुन सदर अर्ज दि.०१.११.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. याचाच अर्थ सदर अर्ज दाखल करण्यास, कल्याण नामदेव भुजंग मयत झाल्यापासुन सात महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. मात्र वारसांना पटलावर न घेतल्यास अर्जाच्या निकाल वारसदारांच्या बाजुने आल्यास, वारसदारांना फायदा होणार नाही. सबब मयताचे वारस पटलावर घेणे आवश्यक आहे. उपरोक्त कारण मिमांसेवरुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. ३ चे वारस पटलावर घेण्यात यावेत व त्याप्रमाणे अर्जात दुरुस्ती करुन अर्जाची दुरुस्ती प्रत आदेश दिनांकांपासुन १४ दिवसाच्या आत पटलावर दाखल करावी.

३. दोन्ही विधीज्ञांनी आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2025.11.12 12:00:33 -0100

दि. ११/११/२०२५

**(आर.एन. पाठक )**
सह दिवाणी न्यायाधीश, (व.स्तर),
गंगापुर

## **C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this PDF file Judgment are same, word to word as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Balu Ashruba Age<br>Stenographer Grade 2 |
| Court | : CJSD Court, Gangapur. |
| Judgment date | : 11/11/2025 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 11/11/2025 |
| Judgment uploaded on | : 12/11/2025 |